दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990
लातूर वर्ष ४ थे अंक २४१ वा बुधवार दि.१९ मार्च २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




## शासकीय कार्यालयांमध्ये तंबाखू सेवन करणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कार्यवाही करा-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे






लातूर :- राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने कॅन्सरसारखे गंभीर आजार होतात. अशा आजाराने मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांवर संकट कोसळते. यासोबत या पदार्थांचे सेवन अस्वच्छतेला कारणीभूत ठरत असल्याने शासकीय कार्यालयात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केल्या.

जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयामार्फत आयोजित विविध समितींच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, निवासी आरोग्य अधिकारी डॉ. अशोक सारडा, वैद्यकीय अधीक्षक डॉ. आनंद कलमे, लातूर शहर महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शंकर भारती, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्यासह जिल्ह्यातील सर्व ग्रामीण रुग्णालयांचे वैद्यकीय अधीक्षक, आरोग्य विभागातील अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणारे आजार जीवघेणे असल्यामुळे या पदार्थांच्या व्यसनापासून सर्वांनी दूर राहणे आवश्यक आहे. या व्यसनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती देण्यासाठी आरोग्य विभागाने समुपदेशन आणि जनजागृती उपक्रमांचे आयोजन करावे. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ्यांच्या सेवनाने कॅन्सरसारखा आजार होवून अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे नागरिकांनी अशा व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले. प्रत्येक ग्रामीण रुग्णालय स्तरावर राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमासाठी स्वतंत्र पथक स्थापन करावे. यामध्ये आरोग्य विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यासोबत पोलीस, महसूल, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश करावा. या पथकाने प्रत्येक आठवड्यात अचानकपणे गुटखा विक्रीच्या अनुषंगाने तपासणी मोहीम राबवावी, असे त्यांनी सांगितले. सोनोग्राफी सेंटरची तपासणी करण्याच्या सूचना जिल्ह्यात स्त्रीभ्रूणहत्या होवू नयेत, यासाठी आरोग्य विभागाने सतर्क राहणे आवश्यक आहे. सध्या याबाबतच्या कोणत्याही घटना जिल्ह्यात घडलेल्या नसल्या तरी खबरदारीचा उपाय म्हणून जिल्ह्यातील सोनोग्राफी सेंटरची अचानक तपासणी करण्याची मोहीम प्रत्येक ग्रामीण रुग्णालय स्तरावर राबवावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. तसेच गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्र कायद्याबाबत जिल्ह्यात प्रशिक्षणाचे आयोजन करावे, असे त्यांनी सांगितले.

१० ऑक्टोबर २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या तंबाखू मुक्त युवा अभियान अंतर्गत तंबाखूजन्य पदार्थांच्या व्यसनमुक्तीविषयी जनजागृतीकरिता आयोजित रिल्स स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्राप्त उमेश गावकरे यांना ७ हजार रुपये, द्वितीय क्रमांक प्राप्त डॉ. सिद्धेश्वर हुकीरे यांना ५ हजार रुपये व तृतीय क्रमांक प्राप्त कपिल वाघमारे यांना ३ हजार रुपयांचा धनादेश व स्मृतिचिन्ह देवून जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रम समितीचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

## मालमत्ताधारकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन थकीत व चालू वर्षाचा कर भरणा करून जप्ती टाळावी- आयुक्त



लातूर/प्रतिनिधी : कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने वर्षाच्या शेवटच्या महिन्यात अधिकाधिक कर संकलन होण्याच्या दृष्टीने मालमत्ताधारकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारचे सुटची योजना लागू करण्यात आली होती. वर्षाच्या सुरुवातीस व शेवटच्या महिन्यात चालू आर्थिक वर्षातील मालमत्ताधारक यांना प्रोत्साहन देण्यासाठी योजना लागू करण्यात आले आहेत.सध्या चालू वर्षातील मालमत्ताधारक साठी महानगरपालिकेमार्फत दिं १८ मार्च २०२५ ते २४ मार्च २०२५ पर्यंत फक्त चालू मागणीवर (सन २०२४-२५) आकरण्यात आलेल्या व्याज/शास्तीमध्ये १०० टक्के सूट देण्यात येत आहे. तसेच सदरील योजना थकबाकीदार मालमत्ता धारक यांना लागू राहणार नाही . तसेच आर्थिक वर्ष संपत आल्याने या आर्थिक वर्षातील मालमत्ताधारक कराचा भरणा करणार नाही अशा मालमत्ताधारकांची सुद्धा मालमत्ता जप्त करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे .तसेच यापूर्वी जप्त केलेल्या मालमत्ताची लिलाव प्रक्रीया राबवून , थकबाकीधारकांची नावे वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करून कर वसूल करण्यात येणार आहे.

तरी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी चालू वर्षातील मालमत्ताधारकांनी वरील देण्यात आलेल्या मुदतीमध्ये आपल्याकडील देय असलेल्या कराचा भरणा एक रक्कमी करावा. व जप्तीसारखी कठू कार्यवाही टाळावी असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे

## २० व २१ मार्चला लातूर ग्रंथोत्सव २०२४ चे आयोजन

लातूर : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय , महाराष्ट्र राज्य, चमुंबई आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, लातूरच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथे दि. २० व २१ मार्च २०२५ रोजी लातूर ग्रंथोत्सव - २०२४ चे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती लातूरच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी सौ. वंदना काटकर यांनी दिली. या ग्रंथोत्सवादरम्यान ग्रंथ प्रदर्शन, विक्रीसह विविध कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. हा ग्रंथोत्सव कार्यक्रम लातूरच्या औसा रोडवरील आदर्श कॉलनीमधील कम्युनिटी हॉल याठिकाणी होणार आहे. गुरुवार, दि. २० मार्च रोजी सकाळी आठ वाजता क्रीडा संकुलापासून निघणाऱ्या ग्रंथदिंडीने या ग्रंथोत्सवाची सुरुवात होईल. माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ, लातूरचे अध्यक्ष सुधाकर तेलंग यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे पूजन होईल. यावेळी मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सदस्य डॉ. नरसिंग कदम, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे , प्राचार्य डी.एन. केंद्रे, कालिदास माने, दिलीप गुंजरगे आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. ग्रंथदिंडीनंतर ग्रंथोत्सव आणि ग्रंथ दिंडीचे उदघाटन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे राहतील. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खा. ओमराजे निंबाळकर, खा. डॉ. शिवाजी काळगे , आ. विक्रम काळे, आ. सतीश चव्हाण, आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, आ. अमित देशमुख, आ. संजय बनसोडे, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेश कराड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, राज्याचे प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, विभाग ग्रंथालय संघाचे कार्यवाह राम मेकले , जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या सत्रात 'आपला मान आपला स्वाभिमान ' या विषयावरील परिसंवाद होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून भूषणकुमार जोरगुलवार, डॉ. राजशेखर सोलापुरे , विलास सिंदगीकर यांची उपस्थिती राहणार आहे. त्यानंतर निमंत्रितांचे कवी संमेलन होईल. कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी आणि वात्रटिकाकार भारत सातपुते हे राहणार आहेत. यामध्ये मान्यवर कवी आपल्या रचना सादर करतील. शुक्रवार, दि. २१ मार्च ऐवजी सकाळच्या सत्रात ' मला आवडलेले पुस्तक' या विषयावर कार्यक्रम होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक अनंत कदम हे राहणार आहेत. यामध्ये शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. त्यानंतर ' माझी मराठी अभिजात मराठी ' या विषयावरील परिसंवाद होईल. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कादंबरीकार डॉ. शेषेराव मोहिते हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रदीप नणंदकर, योगीराज माने, डॉ. ज्ञानदेव राऊत, श्रीमती अनिता येलमटे सहभागी होतील. दुपारच्या सत्रात ' लातूरची साहित्य संस्कृती ' या विषयावरील परिसंवाद होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सोमनाथ रोडे हे राहतील. प्रमुख वक्ते म्हणून जयप्रकाश दगडे, डॉ. जयद्रथ जाधव, विवेक सौताडेकर, धनंजय गुडसूरकर उपस्थित राहणार आहेत. शुक्रवारी दुपारी ४ ते साडेपाच या वेळेत ग्रंथोत्सवाचा समारोप होणार आहे. समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समीक्षक डॉ. सूर्यनारायण रणसुभे हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लेखक व समीक्षक डॉ. भास्कर बडे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा कोषागार अधिकारी श्रीमती उज्वला पाटील, शिक्षणाधिकारी ( योजना ) तृप्ती अंधारे यांची उपस्थिती राहणार आहे. या ग्रंथोत्सवास जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रातील ग्रंथपाल, कार्यकर्ते, पदाधिकारी व ग्रंथप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व ग्रंथोत्सव यशस्वी करावा असे आवाहन ग्रंथोत्सव संयोजन समितीचे अध्यक्ष छत्रपती संभाजीनगरचे सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, आत्माराम कांबळे, डॉ. जयद्रथ जाधव, सदस्य सचिव तथा जिल्हा ग्रंथालय अधिकारी सौ. वंदना काटकर, ग्रंथोत्सव समन्वय समितीचे राजेंद्र कोरे, सुधीर आचार्य, हिरालाल पाटील, पांडुरंग आडसुळे, हावगीराव बेरकीळे यांसह सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे. लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीतील ग्रंथपाल, कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी या ग्रंथोत्सवास उपस्थित राहणे अनिवार्य असल्याचे कळविण्यात आले आहे.

## ऐतिहासिक संशोधनासाठी मोडी लिपी प्रशिक्षण गरजेचे प्रा. महेश जोशी



लातूर : - ऐतिहासिक संशोधनासाठी मोडी लिपी प्रशिक्षण गरजेचे आहे, ते एक वास्तववादी इतिहास जाणून घेण्याचे प्राथमिक साधन असून त्याद्वारे घटनेच्या मुळाशी जाता येते असे प्रतिपादन पुणे येथील मोडी लिपीचे प्रशिक्षक प्रा. महेश जोशी यांनी केले. श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील इतिहास विभागाच्यावतीने सात दिवशीय प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे हे होते. तर विचारपीठावर संयोजक इतिहास विभाग प्रमुख डॉ. सदाशिव दंदे, इतिहास मंडळाचे सचिव शुभम दांडगे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. जोशी म्हणाले की, भारतात प्राचीन काळापासून प्रशासनात आणि व्यवहारात मोठ्या प्रमाणात मोडी लिपीचा अवलंब केला जात होता. यादव काळ, शिवकाळ, पेशवे काळ आणि ब्रिटिश काळ असे मोडी लिपी विकासाचे चार प्रमुख टप्पे पडतात. सन १९५० पर्यंत महाराष्ट्रात प्रशासनात मोडी लिपीचा अवलंब केला जात होता आणि व्यवहारातही वापर केला जात होता. आजच्या आधुनिक काळात अनेक स्थावर मालमत्तेविषयी निर्माण झालेले प्रश्न प्राचीन व मध्ययुगीन काळातील मोडी लिपीच्या कागदपत्रावरून न्याय निवडा करण्यास बऱ्याच प्रमाणात उपयुक्त ठरतात. सन १९५० पूर्वीच्या महाराष्ट्रातील कुणबीच्या सर्व नोंदी मोडी लिपीतच असल्यामुळे त्या मराठीत करण्यासाठी लिप्यंतर (भाषांतर) करणाऱ्यांची गरज आज मोठ्या प्रमाणात आहे आणि त्यासाठीच तरुणांसाठी, वकील मंडळींसाठी, ऐतिहासिक संशोधनासाठी तसेच सर्व अभ्यासकांसाठी मोडी लिपीचे प्रशिक्षण गरजेचे आहे असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. रत्नाकर बेडगे यांनी लिपी, भाषा ही त्या त्या प्रांतातील संस्कृती वहन करण्याचे प्रभावी साधन असते त्यामुळे महाराष्ट्रातील संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी आजच्या काळात तरुणांनी मोडी लिपीचे प्रशिक्षण घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर त्याच्या विकासासाठी करावा असे इतिहासाचे अनेक दाखले देत आपले मत नमूद केले. या प्रसंगी डॉ. अश्विनी रोडे, प्रा. भीमाशंकर शिंदे, इतिहास मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि इतिहास प्रेमी मोडी लिपीचे प्रशिक्षणार्थी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक इतिहास विभाग प्रमुख डॉ. सदाशिव दंदे यांनी केले. सूत्रसंचालन कु. साक्षी घोडके यांनी तर कु. बुशरा सैय्यद हिने आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इतिहास मंडळाचे सदस्य धीरज गायकवाड, कु. अवंतिका यादव, कु. गायकवाड, शुभम आदींनी परिश्रम घेतले. हा प्रशिक्षण वर्ग शनिवार दि. २२ मार्च २०२५ पर्यंत सुरू राहणार आहे. तरी लातूर शहरातील इच्छुकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, आणि संयोजक यांनी केले आहे. प्रशिक्षण वर्गात सहभागी होण्यासाठी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. सदाशिव दंदे (९४२३७१९८६४) यांच्याशी संपर्क साधावा.

## उपविभागीय कार्यालयातील अव्वल कारकून गणेश एडके यांना वाढदिवसानिमित्त पत्रकारांनी दिल्या शुभेच्छा



लातूर :- लातूर उपविभागीय कार्यालयातील अव्वल कारकून गणेश एडके यांचा १८ मार्च रोजी वाढदिवस असल्यामुळे पत्रकारांच्या वतीने शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आले , यावेळी लातूर उपविभागीय कार्यालयातील नायब तहसीलदार सुधीर दादा देशमुख, पत्रकार रघुनाथ बनसोडे, अशोक हनवते, हारून सय्यद, श्री गंगाधर आरडले आदी उपस्थित होते

## नागपुरातील परिस्थिती नियंत्रणात ;गृहराज्यमंत्र्यांची माहिती



नागपूर : प्रतिनिधी सोमवारी रात्री साडेबारा-दीडच्या सुमारास पोलिस प्रशासनाने नागपूरमधील परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. नागपूरच्या काही झोनमध्ये कलम १४४ (कर्फ्यू) आपण लावले आहे, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली. दरम्यान, नागपुरात सोमवारी रात्री तणाव निर्माण होऊन दगडफेक, जाळपोळ झाली होती. त्यानंतर शहरात शांतता राखण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी, काँग्रेसचे आमदार विकास ठाकरे यांनी केले आहे. नागपूरची परिस्थिती सध्या नियंत्रणात आहे, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली.

## संपादकीय....

### बांगला देशी घुसखोरांचे वास्तव्य

नाशिकच्या मालेगावमध्ये किमान शंभर बांगला देशी घुसखोरांचे वास्तव्य, विदर्भातील अमरावती महापालिका क्षेत्रात सुमारे साडेचार हजार बांगला देशी आणि रोहिंगे आश्रयाला, नाशिकच्याच कळवणलगत एका खेड्यात १८१ मुस्लिम ग्रामस्थ पीएम किसान योजनेचे बोगस लाभार्थी, तीन आरोप वेगवेगळ्या तीन ठिकाणचे असले तरी ते करणारी व्यक्ती एकच आणि तिचा रोख प्रशासकीय व्यवस्थेवर असणे हे त्यामधील समान धागे आहेत. अनेकदा प्रशासकीय शैथिल्य गंभीर बाबीचे मूळ ठरून त्यावरून उद्भवणार्या परिणामांचा सामना करताना कारभार्यांच्या नाकीनऊ येते.

भाजप नेते किरीट सोमय्या यांनी उपरोल्लेखित आरोपांची पुराव्यांनिशी राळ उठवत प्रशासनाला भंडावून सोडले होते. चौकशीच्या सोपस्कारांत मालेगावमध्ये तीन हजारजणांना नोटिसा आणि १५ व्यक्तींविरोधात गुन्हे दाखल झाले असले तरी मूळ प्रश्न अनुत्तरित राहतो तो म्हणजे हे कथित घुसखोर त्या त्या ठिकाणी आश्रयाला आलेच कसे? हा संशयकल्लोळ आपल्यासोबत भावंडांप्रमाणे राहणार्या आणि घुसखोरांना मदतीचा हात देणार्यांच्या राष्ट्रनिष्ठेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरू शकतो. गेल्या सहा महिन्यांत भारतात दोन लाख बांगला देशी घुसखोरांनी प्रवेश केल्याचा सोमय्या यांचा आरोप आहे. सोमय्या यांच्या लेखी घुसखोर बांगला देशींना भारतात स्थायिक करून घेण्यासाठी मोठी यंत्रणा कार्यरत आहेच; शिवाय त्यासाठी मोठ्या प्रमाणात फंडिंग केले जात आहे. यास्तव त्यांनी मालेगावचे उदाहरण समोर ठेवत येथील घुसखोरांच्या पुनर्वसनार्थ आर्थिक घोटाळ्यातील ३८९ कोटींची रसद पुरवल्याचा गंभीर आरोप केला. घुसखोरांच्या पुनर्वसनासाठी खोटी कागदपत्रे देऊन संबंधित व्यक्ती मालेगावमध्ये जन्मल्याचे प्रमाणपत्र बहाल करून स्थानिक प्रशासनाचा हातभार लागल्याचेही सोमय्या ठामपणे सांगतात. गेल्या विधानसभा निवडणुकीदरम्यान हा घोटाळा झाल्याचा तसेच घुसखोरांकडे बोगस रेशन कार्डे असल्याचेही सोमय्यांचे म्हणणे आहे. यामुळे देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो, हे त्यांनी नमूद केले. सोमय्यांचे आरोप राजकीय मानले तरी राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनीही या मुद्द्यावर भाष्य करून जणू सोमय्यांच्या आरोपांची पुष्टी केल्याने वातावरण तापले आहे. घुसखोर बांगला देशींना कोलकात्याहून मदत होत असल्याचे कदम यांचे वक्तव्य दुर्लक्षून चालणार नाही.

विदर्भाच्या अमरावतीत मालेगावप्रमाणेच बांगला देशी आश्रयास आल्याचे सांगत सोमय्या यांनी तेथील आकडा साडेचार हजार व्यक्तींचा असल्याचे पोलिसांना दिलेल्या ४६८ पानी पुराव्यात स्पष्ट केले आहे. याहून गंभीर प्रकार नाशिकच्या कळवण तालुक्यातील भादवण येथे उघडकीस आला आहे. मूळ गावात एकही मुस्लिम कुटुंब नसताना तब्बल १८१ मुस्लिम व्यक्ती पंतप्रधान किसान सन्मान योजनेचे लाभार्थी असल्याची बाब सोमय्या यांनी जगजाहीर केली आहे. या सर्वांना योजनेचा पहिला हप्ता मिळाल्यानंतर हे लाभार्थी नेमके कोण, याची पंचक्रोशीत चर्चा झाली. यामधील धक्कादायक गोष्ट म्हणजे या मुस्लिम कुटुंबांचे बँक खाते बांगला देश सीमावर्ती भागातील असल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध झाले. स्थानिकांनी ही बाब प्रशासनाच्या नजरेत आणून देऊनही त्याकडे सपशेल दुर्लक्ष करण्यात आले. दस्तुरखुद्द सोमय्या यांनी स्थानिक तहसीलदारांवर प्रश्नांची सरबत्ती करूनही त्यांना केवळ टोलवाटोलवी अनुभवावी लागली.

प्रश्न मालेगाव, अमरावती किंवा कळवणमधील खेड्याचा नाहीच मुळी. बाह्य देशातून आलेले घुसखोर निर्ढावल्यासारखे आपल्याकडे येतात आणि बस्तान बसवतात, हे देशहिताच्या कोणत्याच चौकटीत बसत नाही. ही मंडळी इकडे पोहोचतातच कशी, याबाबत ना पोलिस खाते, ना प्रशासनाला मागमूस नसणे ही गंभीर बाब आहे. हा मुद्दा भाजप नेत्याने उपस्थित केला, हा वादाचा मुद्दा असू शकतो. तथापि, त्याची सविस्तर आणि उच्च पातळीवर चौकशी होणे गरजेचे आहे. एखाद्या ठिकाणाहून दुसर्या ठिकाणी वास्तव्यास जाणे आणि बस्तान बसवणे सहजसोपे नाही. त्यासाठी कागदपत्रांसह आर्थिक बळाची गरज असताना शेकडोजण ही तजवीज कशी करतात, हा महद् सवाल आहे. यावर सरकारी स्तरावर काय पावले उचलली जातात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# शिव संभु कालीन मराठा साम्राज्य आणी शुरवीर शेतकरी महार (बौद्ध) समाज

गेल्या महिन्यात दोन महत्वपूर्ण घटना महाराष्ट्रात पहायला मिळाल्यात.एक म्हणजे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर आधारीत छावा चित्रपट प्रकाशित झाला. हा चित्रपट श्री शिवाजी सावंत यांच्या मराठी कादंबरीवर आधारीत आहे, चित्रपटाचे निर्माते श्री दिनेश विजन व दिग्दर्शक श्री लक्ष्मण उतेकर आहेत. छत्रपती संभाजी महाराज यांच्या भूमिकेत श्री विकी कौशल व औरंगजेब यांच्या भूमिकेत श्री अक्षय खन्ना यांनी उत्कृष्ट अभिनय केला आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आधारित चित्रपट असल्यामुळे वास्तविक सामाजिक भूमिका जनतेसमोर प्रस्तुत करने हे अपेक्षित होते परंतु दुर्दैव म्हणजे महार जातीच्या शुरवीरांच्या इतिहासाकड़े जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले.अंगरक्षक रायप्पा महार ज्यांनी संभाजी महाराजांना सोडविण्याचा शेवटचा धाडसी प्रयत्न केला व प्राणाचे बलिदान दिले, गोपाळ गणपत महार जे संभाजी महाराज यांच्या लढाईत अग्रसर राहत असायचे या इतिहासावर पड़दा टाकण्यात आला. गणपत (गायकवाड) महार व अनेक महार सैनिक ज्यांनी रायगढ़ किल्ल्याचे उत्कृष्ट बांधकाम केले,किल्ल्याची रक्षा केली,लढाईत योगदान दिले या कडे चित्रपटात दुर्लक्ष करण्यात आले.औरंगजेबाच्या धास्तीमुळे संभाजी महाराज यांचा सन्मानपूर्वक अंतिम संस्कार करण्यास कोणीही समोर येत नव्हते अश्या कठीण परिस्थितीत गोविंद महार व त्यांचे साथीदार यांनी पूढ़ाकार घेऊन संभाजी महाराज यांच्या देहाचे छिन्न छिन्न अंग/अवयव गोळा करून व शिवून घेऊन महारवाड्या शेजारी अग्नी देऊन सन्मानपूर्वक अंतिम संस्कार केला हे पूर्णपणे चित्रपटात झाकण्यात आले. संभाजी महाराजासोबत विश्वासघात करणारे गणोजी शिर्के याकडे कॅमेराचे लक्ष्य गेले परंतु अन्नाजी दत्तो यांच्याकडे कॅमेराने पाठ दाखविली. कटकारस्थान करणारे व ज्यांना हत्तीच्या पायाखाली तुडविण्यात आले असे बाळाजी आवजी, श्याम आवजी, सोमाजी दत्तो, हिरोजी फर्जत या घटनेला जास्त महत्व न देता कॅमेरानी धावती दृष्टी ठेवली.

दूसरी महत्वपूर्ण घटना म्हणजे महाराष्ट्राचे मुख्यमन्त्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केलेला महार समाजाचा गौरवशाली इतिहास. भारतीय सैन्य दलातील महार रेजीमेंट शौर्य पुरस्कार प्राप्त सैनिकांचा गौरव सभारंभमधे महाराष्ट्राचे मुख्यमन्त्री श्री देवेंद्र फड़णवीस यांचे गाजलले भाषण व महार समाजा विषयी काढलेले गौरव उदगार. मी श्री फडणवीस यांच्या राजकीय भूमिकेचे समर्थन करीत आहो असा गैरसमज करू नये. परंतु जे लोक विशेष करून मराठा/ओबीसी समाजाचे जे महार समाजाच्या गौरवशाली इतिहासाला हीन/तुच्छ भावनेने मान्यता देत नाही किंवा स्वीकार करीत नाहित त्यांच्यासाठी हे भाषण मोलाचे आहे कारण सोनाराच्या हातानी कान टोचलले व काट्यानी काटा काढलेले केव्हाही बरे. श्री फडणवीस यांचा उद्देश काय हे महत्वाचे नाही आहे कदाचित त्यांचा इशारा जरांगेशाही कडे असेलही.श्री फडणवीस आपल्या भाषणात जे म्हणतात जो समाज आपल्या इतिहासाला, शुरविरांना,सैनिकांना विसरतो....... याचा रोख महार समाजाकडे राहुच शकत नाही. परंतु याचा बोध मराठा समाजाने घ्यायला पाहिजे जे महार समाजाचा गौरवशाली इतिहास नाकारतात, जे मराठा साम्राज्यला बाजुला ठेऊन पेशवाईला शरण गेलेत,जे छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती संभाजी महाराज यांच्या समाधीचे सन्मानपूर्वक रक्षण ही करू शकले नाहीत.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीचा शोध महात्मा ज्योतिबा फुले यांनी लावला व शिव जयंती प्रारंभ केली तर संभाजी महाराज यांची समाधी १९३९ मधे जेष्ठ इतिहासतज्ञ श्री बेंद्रे यांनी अरण्यातुन/जंगलातुन शोधून काढली. श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या भाषणाचे संक्षिप्त उदगार त्यांच्याच भाषेत :

आज आपल्या सगळ्याकरिता गौरवाचा दिवस आहे की भारताच्या इतिहासामधे ज्या महार रेजीमेंट नी प्रचंड मोठी शौर्याची कामगिरी केली त्या रेजीमेंट च्या शौर्य पुरस्कार प्राप्त सैनिकांचा गौरव, त्यांच्या कुटुंबियांचा गौरव आज या ठिकाणी महाराष्ट्र सरकारला संधी मिळाली आहे. खरतर एक मोठा इतिहास या रेजीमेंट चा देखील राहला आहे. विशेषता आपण बघीतल तर अतिशय प्राचीन काळा पासून आणि विशेषता छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळा पासून आमच्या महार समाजातील शौर्य गाथा त्या ठिकाणी पहायला मिळतात आणि म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत महत्वाच्या पदावर आमच्या त्या वेळेच्या महार समाजाच्या सैनिकांना वेगवेगळ्या जवाबदाऱ्या दिल्या आपण बघितल्या आणि शिवाजी महाराजांचे किल्ले असतील,संभाजी महाराजांचे किल्ले असतील या किल्लाच्या सरंक्षणाची जवाबदारी मोठ्या प्रमाणात आमच्या महार सैनिकांना त्या वेळेस होती.रायगड किल्ल्याचे किल्लेदार ज्यांना शहनाक महार या नावाने ओळखले जायचे यांची देखील एक प्रचंड वीरगाथा आपल्या सगळ्याना ज्ञात आहे.त्याचप्रमाणे रोहडा किल्ल्याची जवाबदारी असणारे कालनाथ महार व सोनकर महार यांची देखील एक अत्यंत मोठी गाथा आपण सगळ्यांनी अनेक वर्ष पाहली आहे. बुर्हाणपूरमधे ज्या वेळेस संभाजी महाराजांना शत्रुनी घेरल त्यावेळी २५ महार सैनिक त्याठिकाणी गेले आणी ज्या प्रकारे त्यांनी सम्पूर्ण महाराजांना संरक्षण दिल आणी त्या ठिकाणच मुगल सैन्य कापून काढल याची देखील एक फार मोठी शौर्य गाथा आपण सगळ्यांनी बघीतली आहे आणी म्हणून आपण जर बघीतल तर मोघलांच्या नाकात दम आणणारे नागेवाडीचे महार आणी मोजे विलम चे सिद्धनाथ महार यांचा देखील गौरवशाली इतिहास या ठिकाणी आपल्याला पहायाला मिळाला आहे. खरड्याची लढाई असो,भीमा कोरेगांवची लढाई असो, एक प्रचंड मोठे शौर्य महार सैनिकांनी त्या ठिकाणी केल्याच आपण इतिहासा मधे सातत्याने पाहतो आणी अश्याच या सैनिकांच्या माध्यमातन त्या ठिकाणी महार रेजिमेंट ज्या वेळी तयार झाली आणी अतिशय मोठे शौर्य महार रेजीमेंटनी त्या काळात गाजविल. दुर्दैवाने ही रेजीमेंट बंद झाल्यानंतर पुनः एकदा ज्या वेळेस पहिले महायुद्ध शुरू झाल त्यावेळी ब्रिटिशांना पुनः एकदा सैनिकांची आवश्यकता होती, शुरुवीरांची आवश्यकता होती आणी म्हणून पुनः १९१७ साली पुनः एकदा महार रेजीमेंटच पुनर्जीवित करण्यात आल परंतु दुर्दैवाने लढाई संपल्यानंतर इतक्या अतुल शौर्य ज्या रेजीमेंट नी गाजविल लढाई संपल्यानंतर पुनः एकदा त्या रेजीमेंटला बंद करण्याचे काम करण्यात आले. मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकरानी १९४१ साली पुनः एकदा पुढाकार घेतला आणी इंग्रजाच्या समोर या महार रेजीमेंटच्या शौर्याची गाथा मांडली आणी इंग्रजांना लक्षात आणून दिल की ज्या ज्या वेळी आवश्यकता पडली त्या त्या वेळी या महार रेजीमेंटनी इतक अतुलनीय शौर्य दाखविले आहे आणी इंग्रजांना जे काही विजय प्राप्त झाले किंवा इंग्रजाना वेगवेगळ्या पहिले महायुद्ध असेल, दुसऱ्या महायुद्धाची शुरुवात असेल या सगळ्या महायुद्धात हे जे काही आमचे महार रेजीमेंटचे सैनिक आणी अधिकारी आहेत यांच्या मुळेच खऱ्या अर्थान तक धरता आला व विजय प्राप्त करता आला आणी म्हणून पुनः त्याच स्वरूपामधे ही रेजीमेंट शुरु झाली पाहिजे. अश्या प्रकारचा आग्रह त्या ठिकाणी खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धरला आणी १९४१ साली महार रेजीमेंटची पुनर्स्थापना त्या ठिकाणी बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळेच झाली आणी या ठिकाणी त्यांची सगळी शौर्य गाथा या ठिकाणी आपण बघीतली आहे. लढाई कुठली ही असो त्या लढाई मधे ज्या प्रकारच अतुलनीय शौर्य आमच्या महार रेजीमेंटनी दाखविले आहे. आपण बघीतल ९ युद्ध क्षेत्र सन्मान,१२ रनक्षेत्र सन्मान,१ परमवीर चक्र, १ अशोक चक्र, ९ परम विशिष्ठ सेनापदक, ४ महावीर चक्र, ४ कीर्ति चक्र, १ पदमश्री, ३ उत्तम सेवा पदक, १६ अति विशिष्ठ सेवा पदक, ३० वीर चक्र, ३९ शौर्य चक्र आणी २२० सेना मेडल असा हा प्रचंड मोठा शौर्याचा आलेख आमच्या महार रेजीमेंटनी खऱ्या अर्थाने या देशात उभा केला आहे आणी म्हणून या आमच्या महार रेजीमेंटच्या शूर सैनिकांचा या ठिकाणी सत्कार व्हावा आणि या ठिकाणी ७५ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पुनः एकदा त्यांच्या शौर्याची गाथा ही संपूर्ण भारतासमोर यावी आणी अनेकांना प्रेरणा मिळावी या दृष्टीने खऱ्या अर्थाने आजचा कार्यक्रम आयोजित केला आहे. भारताच्या परंपरेमधे दोनच गोष्टीना आपण महत्व दिले आहे, एक शौर्याला आणी दूसरे त्यागाला. शौर्य आणी त्याग या दोन गोष्टीच्या आधारावर आपला इतिहास उभा आहे आणी त्यामुळे जो समाज आपल्या शूर विरांना विसरतो, आपल्या सैनिकांना विसरतो, मातृभूमि करिता बलिदान देणाऱ्याना विसरतो त्याला वर्तमान तर असत पण भविष्य नसत आणी म्हणून भारताच्या भविष्याकरिता अश्या प्रकारची आठवण करण आणी आपल्या सैनिकांचा सन्मान करने आपल सर्वाचे कर्तव्य आहे आणी म्हणूनच महाराष्ट्र सरकारने आजचा कार्यक्रम या ठिकाणी आयोजित केला.आमचा सामाजिक न्याय विभाग,त्याचे मंत्री,राज्यमंत्री, बार्टी या सगळ्यांचे अतिशय मनः पूर्वक अभिनंदन करतो.

हे गूढ़ अजूनही कायम आहे की संभाजी महाराज यांच्या अमानुष हत्येनंतर मुगलांचे साम्राज का आले नाही व कालांतराने पेशवाई मधे कसे परिवर्तित झाले. ज्या प्रकारे संभाजी महाराजांची निर्घुन हत्त्या करण्यात आली जसे डोळे,नखे काढणे,जीभ छाटणे आदि अनेक शंका निर्माण करतात.पेशवाई मधे सर्वाधिक अत्याचार औरंगजेब याच्या कठोर धमकीकडे पाठ फिरवून संभाजी महाराज यांचा सन्मानपूर्वक अंतिम संस्कार करणाऱ्या महार जातीवर झाला, गळ्यात मडके व कंबरेला झाड़ू आला. हा असंतोष थांबत नसल्यामुळे महार जातीचा तिव्र असंतोष ऊफाळूण आला ज्याचा प्रत्यय १८२० मधे भीमा कोरेगांव युद्धात पहायला मिळतो. भीमा कोरेगांव युद्धात पेशवाई विरुद्ध परत एकदा महार सैनिकांनी शौर्याचा परिचय दिला व पेशवाई संपुष्टात आणली. इंग्रजांच्या बाजूने युद्ध केल्यामुळे जातीच्या आधारावर अन्याय/अत्याचार याचा विचार न करता महार समाजावर राष्ट्रद्रोहाचा ठपका ठेवला जातो. १८२० मधे एक राष्ट्र किंवा देश अस्तित्वात नव्हता. जवळपास ५५० राजे–राजवाडे होते जे आपसातच प्रभुत्व गाजविण्यासाठी/ दाखविण्यासाठी युद्ध करीत होते. पेशवाईचे दूसरे घटक जसे इंदौरचे होळकर, ग्वालीअरचे शिंदे/सिंधिया,नागपूरचे भोसले,बड़ौदाचे गायकवाड व इतर ही राजे– रजवाडे आधीच इंग्रजांना शरण आले होते.मराठा,पेशव्यांनी सुद्धा मैसूर लढाईत इंग्रजांसोबत हात मिळवनी केली होती. इंग्रज,निजाम,मुगल,आदिलशहाच्या सैन्यात मराठा समेत अनेक जाती, समाज,धर्माचे सैनिक,दरबारी,वकील,पंडित होते जे महत्वपूर्ण प्रशासकीय पदावर होते.औरंगजेबचे सैन्य लाखात होते, एवढ़े तर मुगल/मुस्लीम नव्हतेच.

शिवाजी महाराज,संभाजी महाराज यांच्या काळातील मराठा साम्राज्यात किंवा त्या पूर्वी पण अस्पृश्यता (विशेष करून महार समाजा सोबत) इतकी तीव्र नव्हती असे समजायला हरकत नाही. कारण महार समाजाच्या लोकांकडे शेत जमिनी होत्या व वंशानुगत शेत जमिनी आजही संपूर्ण महाराष्ट्रात अधिकांश गावात आहेत. आमच्या अनेक पूर्वजाकडे शेकड़ो एकर शेत जमीनी होत्या याचे पुरावे सरकारी अभिलेखात आजही पहायला मिळतात. शेती करणारा,अन्नधान्य तयार करणारा, दुग्ध उत्पादन करणारा (व ज्याचा उपभोग सर्वच घेणारे) समाज अस्पृश्य कसा राहु शकतो. महार जातीचे लोक शुर, आणी शेती व्यवसायात सलग्न होते.महार समाजाने आपल्या वीरतेचा व पराक्रमाचा परिचय १४.१०.१९५६ ला पुनः एकदा दिला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शब्दाला प्रमाण मानून ५ लाख लोकांनी विषमतावादी हिंदू धर्माचा त्याग करून बुद्ध धम्माचा स्वीकार केला.आज सम्पूर्ण महार समाज हा बौद्ध धर्मी आहे.

आज पूर्वाश्रमीच्या महार व आताच्या बौद्ध समाजा समोर अनेक आव्हान आहेत. सगळ्यात महत्वाचे म्हणजे राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय पातळीवर जी बौद्ध जनसंख्या दिसायला पाहिजे तशी दिसत नाही आहे. महाराष्ट्रात १ कोटी समेत सम्पूर्ण देशात २ कोटी जनसंख्या ही बौद्धांची आहे. जगाच्या पाठीवर असे बरेच देश आहेत ज्यांची कुल जनसंख्या ही २ कोटी नाही आहे. भारतामधे बौद्धांची जनसंख्या २ कोटी आंतरराष्ट्रीय स्तरावर दिसायला लागली तर विकसित बौद्ध राष्ट्राकडून मदत, संरक्षण, आर्थिक/शैक्षणिक/रोजगार सहायता मिळेल. बुद्धगया महाबोधी महाविहार सम्पूर्णपणे बौद्धांच्या नियंत्रणात येईल.बौद्धानी सामाजिक हितासाठी संगठित होऊन सामाजिक, राजकीय वाटचाल करने आवश्यक आहे. नेते संगठित होतील या भ्रमात न राहता सर्वांगीण विकासासाठी गाव/वस्ती म्हणजे ग्राउंड लेवल पासून संगठित व्हावे लागेल. बौद्धानी काळानुरूप परिवर्तन करने आवश्यक आहे. राजकारणात स्थाई मित्र किंवा शत्रु नसतात आणी शत्रु तर राहत नाही. शेवटी विकासोन्मुख कार्य सत्ता व प्रशासन यांच्या कडूनच करून घ्यायचे असतात यासाठी सर्वासोबत उचित सम्पर्क,समन्वय,व सौहार्द्रपूर्ण संबंध आवश्यक असतात.

********

लक्ष्मण बोरकर
मोबाईल : ७७०९३ १८६०७,
नागपूर.

# सामाजिक आणि धार्मिक स्वातंत्र्याचे नेमके स्थान काय...?

आपल्या भारत देशात लोकशाही आहे. लोकांनी लोकांच्या हितासाठी आप आपला प्रतिनिधि विधानसभा आणि लोकसभा मध्ये मतदानाच्या माध्यमातून निवडून पाठवायचा आहे.आणि त्या निवडून गेलेल्या प्रतिनिधीनी कसलाही भेदभाव न करता सर्वांना समान न्याय दयायचा आहे. ती त्या प्रतिनिधिची जबाबदारी आणि कर्तव्य देखील आहे.सर्वच धर्माची माणसे विधानसभा आणि लोकसभा मध्ये प्रतिनिधि म्हणून कार्यरत आहे.आणि ते न्याय देण्यासाठीच त्या ठिकाणी गेलेले आहेत.असे असतांना मागील ३२ दिवसा पासून बुद्धगया या ठिकाणी महाबोधी महाविहारचा ताबा बौद्धांच्या ताब्यात दयावा या मागणीसाठी आंदोलन सुरु असतांना आता पर्यंत केवळ खासदार चंद्रशेखर आजाद यांनी बुद्ध गया मधील महा बोधी विहाराचे व्यवस्थापण बौद्ध प्रतिनिधीच्या ताब्यात देण्यात यावे या मागणीला संसद मध्ये लावून धरली आहे. विशेष म्हणजे त्या आंदोलनात अनेक देशातील भिक्कू देखील बसले आहे. बुद्ध हे जागतिक स्थरावर ओळख असणारी,लोक कल्याण कारी व्यक्ती म्हणून प्रसिद्ध असलेली,प्रचंड ज्ञान संपदा असणारी व्यक्ती म्हणून त्याची गणना जगात होते.त्यानी संपूर्ण मानव जातीला प्रज्ञा,शील,करुनेचा संदेश दिला.त्या ठिकाणी त्याना ज्ञान प्राप्ती झाली होती असे असतांना मागील अनेक वर्षा पासून चार ब्राम्हण पंडित,आणि चार बौद्ध भिक्कू आणि जो जिल्हाधिकारी असेल तो हिंदू धर्मीय राहिल असे असणे अन्याय कारक आहे. त्यामुळे १९४९ चा कायदा टेम्पल ऍक्ट रद्द करावा आणि त्याचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात दयावे ही मागणी ३२ दिवसा पासून सुरु असतांना,आता पर्यंत कोणताही प्रतिनिधि यांनी म्हणजे चंद्रशेखर आजाद वगळता संसद मध्ये मुद्दा मांडला नाही. जो की कोणत्याही संसद सदस्यांना जात,पात,धर्म,पंथ पाळता येत नाही,समान न्यायाची वागणूक देणे हे त्याचे कर्तव्य आहे.संविधानाच्या प्रस्ताविकात धर्मनिरपेक्ष हा प्रामुख्याने शब्द असतांना,आणि प्रतिनिधिना जात,पात,धर्म,पंथ येत नाही असं असतांना आवाज न उठविणे म्हणजे कुठेतरी जात,डोक्यात आहे का? कुठेतरी धर्म डोक्यात आहे का? असे लोकांना वाटायला लागले आहे.

प्रत्येक भारतीयांना आप आपल्या धर्मा प्रमाणे पूजा,अर्चा करण्याचे स्वातंत्र्य नाही का? आणि असेल तर मग त्या महाबोधी विहार या ठिकाणी चार बोद्ध भिक्कू आणि चार ब्राम्हण पुजारी,असे नेमके का? आणि जिल्हाधिकारी हा हिंदूच का? ही बाब आर्टिकल २५ चे म्हणजे धार्मिक मूलभूत अधिकार स्वातंत्र्याचे उल्लंघन आहे.समान न्यायाचे एक प्रकारे उल्लंघन आहे. त्यामुळे समान न्याय देण्यासाठी कटीबद्ध आहोत असे म्हणणाऱ्या आणि जनतेला मत मागणाऱ्या संसद सदस्य यांनी बुद्ध गया येथील महा बोधी विहार या प्रश्ना कडे प्रामुख्याने लक्ष देऊन तो सोडविला पाहिजे तो प्रतिनिधि कोणत्याही जाती,धर्माचा असो,संसद सदस्यांना जात,पात,धर्म,पंथ नसतो.त्याचा मानव धर्म असतो आणि समान न्याय देणे हे त्याचे कर्तव्य असते.

स्वातंत्र्या पूर्वी देखील आम्हाला माणूस म्हणून हक्क आणि अधिकार मिळावे यासाठी हा अस्पृश्य समाज या अन्याय करणाऱ्या



लोकांना सांगत होता.लढत होता, आपली न्यायिक मागणी करीत होता.मग ती समान वागणूक मिळावी यासाठी असेल, मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी असेल,की आम्ही देखील माणसे आहोत म्हणून चवदार तळ्याचा सत्याग्रह करणारी असेल,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अन्याय करणाऱ्या लोकांविरोधात सातत्याने संघर्ष केला,ते लढत होते.१९४७ ला देश स्वतंत्र झाला,संविधान तयार झाले. संविधान ही घटना समिती नी २६/११/१९४९ रोजी स्वीकृत केले ते लागू पण २६/०१/१९५० पासून झाले.आजही आम्हाला आमचा अधिकार मिळाला पाहिजे,जे ज्याचे आहे,त्याला मिळाले पाहिजे म्हणून आंदोलन सुरु असते, अनुशेष भरला जावा यासाठी सातत्याने आंदोलन असते,मागणी असते. ही मागणी कोणाकडे असते. काय? अन्याय संपला,स्वातंत्र्य मिळाल? देशाला स्वातंत्र्य मिळावं यासाठी लढणाऱ्याना खरंच स्वातंत्र्य मिळाले का? मिळाले असते तर बुद्ध गये मधील महाबोधी बुद्ध विहार पंडया च्या ताब्यातून बौद्धांचे च्या ताब्यात दया अशी मागणी करावी लागली असती का? भिक्कू ना धरणे आंदोलनात बसावं लागले असते. आमचे बुद्ध विहार पंडयाच्या हातून मुक्त करा ही मागणी करावी लागली असती का? म्हणजे आजही हक्क आणि धार्मिक स्वातंत्र्य मिळावं,आणि बुद्ध गया येथील बुद्ध महा बोधी विहार,पंडया च्या हातून मुक्त व्हावं यासाठी लढाई सुरु आहे.ही चिंतेची आणि चिंतनाची बाब आहे.

आर्टिकल १३ मध्ये उल्लेख पण आहे की घटना लागू झाल्यापासून जुने कायदे जे मानवाच्या विरोधात आहे ते सारे संपूस्टात येतील. असे असतांना आजही बुद्ध महा बोधी विहार हे पंडया च्या ताब्यात आहे. याचा अर्थ काय? आणि बौद्ध माणूस ते विहार आम्हाला आमच्या ताब्यात दया म्हणून आंदोलन करीत आहेत याचा अर्थ स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने मिळाले का? ज्याला घटनेने धार्मिक स्वातंत्र्य दिले सर्वांना आप आपल्या धर्मा प्रमाणे पूजा अर्चा करण्याचा अधिकार आहे. खरंच तो मूलभूत अधिकार आजही मिळाला नाही असे २२ फेब्रुवारी २०२५ पासून भिक्कू संघ आणि तेथील बौद्ध माणसे आंदोलन करीत असल्या वरून जाणवते. आता हे आंदोलना चे पडसाद जगात पोहचत आहे. म्हणजे आजही भारतीयांना पाहिजे त्या प्रमाणात स्वातंत्र्य मिळाले नाही असे जगातील लोकांना कळायला लागले आहे.म्हणजे सामाजिक आणि धार्मिक स्वातंत्र्याचे नेमके कोणते मोजमाप आहे. बौद्धांच्या धार्मिक स्वातंत्र्याचे नेमके स्थान काय? या अर्थाने भारतीय समाजा समोर प्रश्न उभा राहतो आहे.तेव्हा भारतीयांनी या महत्व पूर्ण मागणी कडे खऱ्या अर्थाने लक्ष देण्याची गरज आहे. आमच्या भारत देशाचे प्रधानमंत्री सन्माननिय,नरेंद्र मोदीजी जगात जाऊन म्हणतात की मी बुद्धाच्या देशातून आलो आहे. हे सत्य ते जगातील लोकांसमोर मांडतात अगदी ती बाब त्यानी बौद्धाना बुद्ध गयेतील महाबोधी बुद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात देऊन त्याना न्याय दिला तर खऱ्या अर्थाने बुद्धाच्या देशातून आलो आहे हे त्याचे शब्द खऱ्या अर्थाने सार्थक ठरेल म्हणजे च बौद्धांचे सामाजिक आणि धार्मिक स्वातंत्र्य याचे नेमके स्थान भारताच्या प्रधानमंत्री यांच्या हृदयात आहे आणि ते खऱ्या अर्थाने बुद्धाला मानतात हे जगाला दिसेल. या सर्व अर्थाने जगातील अनेक देशाचे लक्ष प्रधानमंत्री आदरणीय नरेंद्र मोदी साहेबा कडे लागले आहे. त्यामुळे बौद्धांचे धार्मिक स्वातंत्र्याचे नेमके स्थान काय...? या देशाचे शासन सांगेल असेच आज तरी भारतीयांना वाटते.

*******


अविनाश टिपले
९९७०९१७३८९
,चंद्रपूर

# उन्हाळ्यात चेहरा सतत तेलकट होतो? जाणून घ्या चेहरा स्वच्छ करण्याची योग्य पद्धत

राज्यभरात सगळीकडे उन्हाचा कडाका वाढला आहे. वाढत्या उन्हामुळे आरोग्यासह त्वचेचे देखील नुकसान होते. या दिवसांमध्ये उन्हात बाहेर जाऊन आल्यानंतर किंवा घरी असताना चेहरा तेलकट आणि चिकट होऊन जातो. सतत येणाऱ्या घामामुळे त्वचेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्यामुळे उन्हाळा सुरु झाल्यानंतर योग्य ते स्किन केअर रुटीन फॉलो करून त्वचेची जास्त काळजी घ्यावी. उन्हात बाहेर जाताना स्कर्फ आणि सनस्क्रीन लावणे अतिशय महत्वाचे आहे. अन्यथा त्वचा काळवंडलेली दिसू लागते. त्वचेची गुणवत्ता खराब झाल्यानंतर ती सुधारण्यासाठी महिला सतत काहींना काही प्रयत्न करत असतात. मात्र तरीसुद्धा त्वचा तेलकट आणि चिकटच दिसते.

धावपळीच्या जीवनशैलीतून वेळ काढत त्वचा आणि केसांची योग्य काळजी घ्यावी. चेहरा तेलकट किंवा चिकट झाल्यानंतर तो योग्य वेळी स्वच्छ न केल्यामुळे पिंपल्स, मुरूम किंवा त्वचेसंबंधित इतरही समस्या उद्भवू लागतात. त्यामुळे फेशवॉशचा वापर करून चेहरा स्वच्छ करावा. आज आम्ही तुम्हाला उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये त्वचेची कशी काळजी घ्यावी? दिवसभरातून चेहरा किती वेळा स्वच्छ करावा? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या टिप्स फॉलो केल्यास त्वचेची खराब झालेली गुणवत्ता सुधारेल आणि चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल कमी होईल.

चेहरा धुवण्याची योग्य वेळ:



त्वचेची काळजी घेताना महिला दिवसभरातून चार किंवा पाच वेळा चेहरा फेसवॉशचा वापर करून स्वच्छ करतात. मात्र सतत फेसवॉश वापरल्यामुळे त्वचेमधील ओलावा कमी होऊन त्वचा कोरडी पडते. त्वचा कोरडी पडल्यानंतर कितीही प्रयत्न केले तरीसुद्धा त्वचेमध्ये नैसर्गिक ओलावा येत नाही. त्यामुळे दिवसभरात दोन वेळाच फेसवॉशचा वापर करून चेहरा स्वच्छ करावा. चेहरा सकाळी आणि रात्रीच्या वेळा स्वच्छ करावा. यामुळे त्वचेवर साचून राहिलेली धूळ, माती निघून त्वचा स्वच्छ होते.

तेलकट आणि मुरुमानी भरलेली त्वचा किती वेळा स्वच्छ करावी:

तेलकट, पिंपल्स आणि मुरुमानी भरलेली त्वचा दिवसभरातून दोनदाच स्वच्छ पाण्याने धुवावी. यामुळे त्वचेवरील धूळ, माती निघून जाण्यास मदत होईल. दिवसभरातून दोन चेहरा धुतल्यामुळे चेहऱ्यावरील पिंपल्स आणि मुरूम कमी होतात. याशिवाय तुम्ही उन्हातून बाहेर जाऊन आल्यानंतर किंवा घामामुळे कंटाळा असाल तर दिवसभरातून तीन किंवा चार वेळा त्वचा स्वच्छ करावी.

कोरडी आणि संवेदनशील त्वचा:

कोरड्या त्वचेमध्ये नैसर्गिक ओलावा अतिशय कमी असतो. त्यामुळे दिवसभरातून त्वचा दोनदा न धुवण्याचा सल्ला दिला जातो. त्यामुळे तुम्ही सकाळी उठल्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ करू शकता आणि रात्रीच्या वेळी फेसवॉश वापरून चेहरा स्वच्छ करून घ्या. यामुळे त्वचेमधील घाण, धूळ, माती कमी होईल आणि पिंपल्स किंवा ऍक्ने येणार नाहीत.

## सकाळच्या नाश्त्यासाठी पारंपरिक पद्धतीने बनवा चविष्ट दडपे पोहे, नोट करून घ्या रेसिपी



सकाळी उठल्यानंतर पोटभर नाश्ता केल्यास आरोग्याला अनेक फायदे होतात. मात्र वाढलेले वजन आणि घाईगडबडीमुळे अनेक लोक सकाळचा नाश्ता करणे टाळतात. पण असे केल्यामुळे आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. सकाळी उठल्यानंतर पोटभर नाश्ता करणे आवश्यक आहे. यामुळे संपूर्ण दिवस आनंद आणि उत्साहामध्ये जातो. वजन कमी करताना सकाळचा नाश्ता करणे टाळल्यास शरीरातील ऊर्जा कमी होऊन थकवा आणि अशक्तपणा जाणवू शकतो. याशिवाय शरीराला इतर गंभीर आजारांची लागण होऊ शकते. त्यामुळे सकाळच्या वेळी पोटभर नाश्ता करणे आवश्यक आहे. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला पारंपरिक पद्धतीमध्ये दडपे पोहे बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. या पद्धतीचा वापर करून दडपे पोहे बनवल्यास चव अतिशय सुंदर लागेल. याआधी तुम्ही दुधाचे किंवा ताकाचा वापर करून बनवलेले पोहे खाल्ले असतील पण आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये दडपे पोहे बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हे पोहे बनवताना अनेक पौष्टिक पदार्थांचा वापर केला जातो. चला तर जाणून घेऊया दडपे पोहे बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य: पातळ पोहे कांदा हिरवी मिरची कोथिंबीर तेल टोमॅटो काकडी ओलं खोबरं हळद लिंबाचा रस जिरं मीठ

कृती: दडपे पोहे बनवण्यासाठी सर्वप्रथम, स्वच्छ साफ करून चाळणीने चाळून घ्या.

त्यानंतर मोठया वाटीमध्ये पोहे घेऊन त्यात बारीक चिरून घेतलेला कांदा, टोमॅटो आणि काकडी टाकून मिक्स करा.

पोह्यांच्या मिश्रणामध्ये किसून घेतलेले ओले खोबरे घालून मिक्स करा. नंतर वरून लिंबाचा रस आणि कोथिंबीर घालून मिक्स करा.

फोडणीच्या वाटीमध्ये तेल गरम करून त्यात बारीक चिरून घेतलेली हिरवी मिरची, हिंग आणि हळद घालून मिक्स करा.


पोह्यांच्या मिश्रणात तयार केलेली फोडणी ओतून मिक्स करा. सगळ्यात शेवटी वरून साखर आणि चवीनुसार मीठ घालून मिक्स करा.

तयार आहेत सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले दडपे पोहे. हे पोहे चवीला अतिशय सुंदर लागतात.

# लघवी करताना आग होते? 'हे' घरगुती उपाय केल्यास तात्काळ मिळेल आराम, मुतखडा पडेल लघवीतून बाहेर

चुकीच्या जीवनशैली, जंक फूडचे अतिसेवन, शरीरात निर्माण झालेला पाण्याचा अभाव, अपुरी झोप इत्यादी अनेक गोष्टींचा आरोग्यावर लगेच दिसून येतो. त्यामुळे रोजच्या आहारात शरीराला पचन होणाऱ्या पौष्टिक आणि पचनास हलक्या असलेल्या पदार्थांचे सेवन करावे. किडनीसंबंधित समस्या वाढू लागल्यानंतर शरीराला हानी पोहचते. शरीरात पाण्याची कमतरता निर्माण झाल्यानंतर किंवा जास्त वेळ लघवी थांबवून ठेवल्यामुळे किडनी स्टोन होण्याची शक्यता असते. किडनी स्टोन झाल्यानंतर पोटामध्ये असह्य वेदना होऊ लागतात. या वेदनांकडे दुर्लक्ष केल्यामुळे स्टोनचा आकार वाढतो आणि किडनीचे आरोग्य बिघडते.

किडनी स्टोन झाल्यानंतर सुरुवातीच्या दिवसांमध्ये जाणवणाऱ्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यामुळे स्टोनचा आकार वाढतो. मोठ्या आकाराचा स्टोन काढण्यासाठी शस्त्रक्रियाच करावी लागते तर आकाराने लहान असलेला किडनी स्टोन घरगुती उपाय करून पडून जातो. किडनी स्टोनची समस्या उद्भवू लागल्यानंतर लघवी करताना जळजळ होणे, पाठदुखी, ओटीपोटात तीव्र वेदना, आणि लघवीतून रक्त येणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. या सर्व समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी आज आम्ही तुम्हाला काही घरगुती उपाय सांगणार आहोत. हे घरगुती उपाय केल्यास लघवीतून किडनी स्टोन बाहेर पडून जाईल आणि आराम मिळेल.





जवाच्या पाण्याचे सेवन करावे:

जवाच्या पाण्यात असलेले गुणधर्म किडनीमधील स्टोन बाहेर काढून टाकण्यासाठी मदत करतो. याशिवाय किडनीमध्ये असलेले टॉक्सिन्स आणि स्टोन बाहेर पडून जाण्यासाठी मदत होते. यासाठी एक ग्लास पाण्यात २ चमचा जव टाकून काहीवेळ पाण्यात भिजत ठेवा. त्यानंतर तेच पाणी टोपात टाकून व्यवस्थित उकळवून घ्या. उकळवून घेतलेले पाणी तुम्ही थंड करून पिऊ शकता. या पाण्याचे सेवन करून किडनीमधील स्टोन एक दोन आठवड्यात बाहेर निघून जाईल. या पाण्याच्या सेवनामुळे किडनीचे सर्व आजार बाहेर होतात.

कुळीथ दाण्याचे सेवन:

आयुर्वेदामध्ये कुळीथ दाण्याला विशेष महत्व आहे. या दाण्याच्या सेवनामुळे शरीराला आवश्यक घटक देखील मिळतात. कुळीथ दाण्याच्या सेवनामुळे किडनीमधील स्टोन लघवीवाटे बाहेर पडून जाईल. आठवड्यातून दोन ते तीन वेळा कुळीथ डाळीचे सेवन केल्यास किडनी स्टोनचा धोका कमी होतो. याशिवाय दैनंदिन आहारात कुळीथ डाळीचे सेवन करणे आरोग्यासाठी अतिशय प्रभावी आहे.

लिंबू पाणी:

लिंबामध्ये असलेले घटक आरोग्याच्या दृष्टीने अतिशय प्रभावी आहेत. लिंबू पाण्याचे सेवन केल्यामुळे किडनीमधील स्टोन विरघळून जातो. शिवाय शरीराला अनेक फायदे देखील होतात. यामध्ये आढळून येणारे सायट्रिक ऍसिड किडनीमधील साचून राहिलेले विषारी घटक बाहेर काढून टाकण्यासाठी मदत करतो. त्यामुळे किडनी स्टोनच्या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी लिंबू पाण्याचे सेवन करावे.

## यकृताच्या आजाराने ग्रस्त पित्याला मुलीने दिले जीवदान! होळीच्या मुहूर्तावर धुळे जिल्ह्यातील कुटुंबाची नवी सुरुवात

महाराष्ट्राच्या धुळे जिल्ह्यातील नवसारे कुटुंबासाठी या वर्षीची होळी खास आहे; कारण त्यांच्या कुटुंबप्रमुखाला दुसरे आयुष्य मिळाल्याने त्यांच्या निरोगी भविष्याची आशा निर्माण झाली आहे. महाराष्ट्र पोलीस खात्यात उपनिरीक्षक असणारे सुरेश नवसारे (४३) हे दीर्घकाळापासून यकृताच्या समस्येने ग्रस्त होते. त्यांना ५ मार्च २०२५ रोजी दिलासा मिळाला. त्यांची मुलगी मयुरी (१८) हिने तिच्या यकृताचा एक भाग दान केल्याने सुरेश यांची प्रकृती सुधारली. काही दिवसांपूर्वीच उपचारानंतर घरी पाठवण्यात आलेल्या मयुरीने तिच्या वडिलांना त्यांच्या आवडीचा होळीचा पदार्थ पुरणपोळी खाऊ घालून शस्त्रक्रियेच्या यशाचा आनंद साजरा केला आणि नवी सुरुवात केली. कुटुंबाने हा क्षण मुलुंडच्या फोर्टिस रुग्णालयासोबत साजरा केला जिथे तिचे वडील बरे होत आहेत. सुरेश यांच्या कुटुंबाने मुंबईतील मुलुंड येथील रुग्णालयाच्या यकृत प्रत्यारोपण आणि एचपीबी सर्जरी विभागाचे प्रमुख डॉ. विक्रम राऊत यांच्या नेतृत्वाखालील तज्ज्ञ पथकाचे आभार मानले.

सुरेश यांना पाच महिन्यांपूर्वी ॲसाइट्स (ज्यामध्ये पोटात द्रव जमा होतो आणि सूज येते) झाल्याचे निदान झाले. त्यांना ऑटोइम्यून लिव्हर फेल्युअर असल्याचे निदान झाले आणि त्यांचे यकृत वेगाने निकामी होऊ लागल्याने त्यांना यकृत प्रत्यारोपण करण्याचा सल्ला देण्यात आला. ऑटोइम्यून लिव्हर फेल्युअरमध्ये शरीराची रोगप्रतिकारक क्षमता सक्रिय होते आणि त्या अवयवावर हल्ला करू लागते ज्यामुळे संबंधित अवयव निकामी होतो. सुरेश त्यांच्या कुटुंबाची काळजी घेण्यासाठी समर्पित निरोगी जीवन जगत असल्याने या आजाराचे निदान झाल्यानंतर कुटुंबियांना आश्चर्य वाटले. सुरेश यांना तोपर्यंत केवळ मधुमेह हा एकमेव आजार होता. त्यांच्या लक्षात आलेले एकमेव लक्षण म्हणजे त्यांच्या पायांना आलेली सूज. मधुमेहामुळे ही सूज येत असल्याचे त्यांना वाटले. डॉक्टरांकडून तपासणी करून घेण्याचा आग्रह कुटुंबियांनी करूनही सुरेशने यांनी त्याकडे लक्ष दिले नाही. तीन जणांच्या कुटुंबातील एकमेव कमावती व्यक्ती असल्याने त्यांना स्वतःच्या प्रकृतीकडे लक्ष देण्यात जास्त वेळ घालवणे किंवा प्रयत्न करणे जमत नव्हते. सुरेश यांचे यकृत निकामी झाल्याचे निदान त्यांच्या कुटुंबाने पूर्णपणे मान्य करण्यापूर्वीच त्यांची मुलगी मयुरी हिने तिच्या मनाची तयारी केली होती. वडिलांनी कायम कुटुंबासाठी कष्ट घेतल्याने आता आपण त्यांना मदत करायची असा निर्धार या १८ वर्षांच्या मुलीने केला होता. माझ्या वडिलांनी आयुष्यभर आमच्यासाठी कष्ट घेतले आहेत आणि जेव्हा डॉक्टरांनी आम्हाला सांगितले की, त्यांना नवीन यकृताची गरज आहे तेव्हा मला काय करायचे आहे हे माहीत होते.

# सिगारेटमुळे फक्त फुफ्फुस नाही तर 'या' ५ अवयवांचीही लागेल वाट

अनेकांना वाटते की सिगारेट फक्त फुफ्फुसांनाच नुकसान करत असते. जर तुम्हाला सुद्धा असेच हातात असेल तर सत्य जाणून तुम्हाला आश्चर्य बसणार आहे. खरंतर सिगारेटचा धूर संपूर्ण शरीरावर विषासारखा प्रभाव टाकतो. ज्यामुळे हृदयापासून मेंदूपर्यंत, त्वचेपासून डोळ्यांपर्यंत, कोणताही अवयव त्याच्या दुष्परिणामांपासून सुरक्षित नाही. काही क्षणांची शांतता देणारी सिगारेट तुमच्या आयुष्यातील अमूल्य वर्षे कमी करत आहे.

धूम्रपानामुळे हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक, दृष्टी कमजोर होणे, अगदी अंधत्व येण्याचा धोका वाढतो. म्हणूनच आज आपण, ही एक सिगारेट शरीराच्या कोणत्या अवयवांना हानी पोहोचवते आणि ते सोडणे आरोग्यासाठी कसे वरदान ठरू शकते, त्याबद्दल जाणून घेणार आहोत. हृदय धूम्रपान करणाऱ्यांमध्ये हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका २ ते ४ पट जास्त असतो. सिगारेटमधील निकोटीन रक्तवाहिन्या अरुंद करतात, ज्यामुळे ब्लड सर्क्युलेशन बिघडते. धुरातील कार्बन मोनोऑक्साइड रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी करते, परिणामी हृदयावर अधिक ताण येतो. उच्च रक्तदाब कायम राहिल्याने हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका वाढतो.

मेंदू सिगारेट स्मरणशक्ती कमी करून डिमेंशियाचा धोका वाढवते. धुरातील विषारी रसायने मेंदूच्या पेशींना हानी पोहोचवतात आणि



मज्जासंस्था कमकुवत करतात. त्यामुळे एकाग्रता आणि विचारशक्ती मंदावते, तसेच स्ट्रोकचा धोका वाढतो. त्वचा सिगारेट त्वचेतील ओलावा आणि आवश्यक पोषकतत्त्वे नष्ट करते, ज्यामुळे सुरकुत्या, डाग आणि त्वचा निस्तेज दिसते. धूम्रपानामुळे कोलेजनचे उत्पादन घटते, त्वचा सैल होते आणि वयाच्या आधी वृद्धत्व दिसू लागते. ऑक्सिजनचा कमी पुरवठा झाल्याने त्वचा काळवंडते. तसेच त्वचेचे तेज हरवते.

मूत्रपिंड सिगारेटमुळे किडनी कर्करोगाचा धोका ५०% ने वाढतो. धुरातील विषारी घटक मूत्रपिंडाच्या ऊतींना हानी पोहोचवतात, ज्यामुळे ते हळूहळू निकामी होण्याची शक्यता वाढते. तसेच, उच्च रक्तदाबामुळे किडनी खराब होण्याचा धोका वाढतो.

डोळे सिगारेटमुळे फक्त फुफ्फुस नाही तर 'या' ५ अवयवांचीही लागेल वाटसिगारेटमधील विषारी घटक डोळ्यांच्या रक्तवाहिन्यांना हानी पोहोचवतात, परिणामी ब्लड सर्क्युलेशन मंदावते आणि दृष्टी कमी होते. सततच्या धूम्रपानामुळे मोतीबिंदू, अंधुक दृष्टी आणि वयोमानानुसार होणाऱ्या मॅक्युलर डीजनरेशन चा धोका तिप्पट होतो, जो पूर्ण अंधत्वास कारणीभूत ठरू शकतो.

# जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी घेतला जिल्हा क्रीडा संकुलातील सुविधांचा आढावा

## संकुलातील गाळेधारकांनी थकीत भाडे जमा करण्याचे आवाहन

लातूर :- जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी थेट जिल्हा क्रीडा संकुल येथे जावून तेथील सुविधांचा आढावा घेतला. याठिकाणी येणारे खेळाडू, नागरिकांना विविध सुविधा क्रीडा उपलब्ध करून देण्यासह परिसराची स्वच्छता आदी बाबींविषयी त्यांनी सूचना दिल्या. तसेच याठिकाणी असलेल्या काही गाळेधारकांकडे गेल्या काही महिन्याचे भाडे थकीत असून त्यांनी ते लवकरात लवकर भरून सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, तहसीलदार सौदागर तांदळे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांच्यासह क्रीडा अधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, संकुलातील गाळेधारक, पोलीस प्रशिक्षण संस्थांचे संचालक यावेळी उपस्थित होते.



लातूर शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या जिल्हा क्रीडा संकुलावर सकाळी व सायंकाळी येणाऱ्या नागरिकांची, खेळाडूंची संख्या जास्त आहे. त्यांना विविध सुविधा उपलब्ध करून देणे, संकुलाची स्वच्छता राखणे यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व महानगरपालिका यांनी संयुक्तपणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. यासोबतच येथील गाळेधारक यांनीही आपल्या दुकानासमोरील परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी पार पाडावी. प्रत्येक दुकानाबाहेर कचरा कुंडी ठेवून नागरिकांना स्वच्छतेचे आवाहन करणारे फलक लावावेत, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. तसेच जिल्हा क्रीडा संकुलाची देखभाल करण्यासाठी येथील गाळेधारकांकडून मिळणारे उत्पन्न महत्वाचा स्त्रोत आहे. त्यामुळे सर्व गाळेधारकांनी आपल्याकडील थकीत भाडे लवकरात लवकर भरण्याचे आवाहन त्यांनी केले. जिल्हा क्रीडा संकुलातील मैदानावर पोलीस प्रशिक्षण संस्थेच्या मुलांना प्रवेशाची वेळ निश्चित करून द्यावी. तसेच याठिकाणी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडून नियमांचे काटेकोरपणे पालन होईल, कोणतीही गैरकृती होणार नाही, याबाबाबत जागोजागी सूचना फलक लावावेत. धावणे आणि चालणे यासाठी स्वतंत्र धावपट्टी असून त्यानुसार संबंधितांना सूचना दिल्या जाव्यात, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या. यावेळी उपस्थित गाळेधारक, नागरिक, खेळाडू यांच्याशीही त्यांनी संवाद साधला, तसेच त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

# अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेच्या विद्याताई तारळकर नारीशक्ती पुरस्काराने सन्मानित

केज/प्रतिनिधी दारव्हा येथे अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषद द्वारा जागतिक महीला दिनाच्या निमित्ताने नारी शक्ती सन्मान व कोष्टी समाज मेळावा संपन्न झाला. यावेळी कर्तृत्ववानमहिला हा पुरस्कार विद्याताई तारळकर यांना यवतमाळ दारव्हा येथे प्रदान करण्यात आला.जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अखित महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेच्या वतीने कर्तृत्ववान महिला म्हणून सन्मान व गौरव करण्यात आला.यावेळी प्रमुखउपस्थिती जगतगुरु श्री श्री श्री दयानंदपुरी महास्वामीजी पिठाधिश, गायत्रीपीठ हम्पी हेमकुट, कर्नाटक हे होते तर प्रमुख उपस्थिती मध्ये ना.संजयभाऊ राठोड मंत्री,मृद व जलसंधारण तथा पालकमंत्री यवतमाळ हे होते तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष व राष्ट्रीय अध्यक्ष,देवांग, देवांगण,कोष्टी,कोष्ठा फेडरेशनचे अध्यक्ष श्री.अरुणरावजी वरोडे, महिला प्रदेश अध्यक्ष सौ मंदाकिनीताई टकले, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री. सतिशराव दाभाडे, श्री.पंडितराव विधाते, श्री.विष्णूभाऊ कुटे, अध्यक्ष




सौ.शैलाताई लोळे,श्री.संजय दादा नवले,श्री.घटे सर,श्री. अशोक अलोने,कोष्टी समाजाचेबीडजिल्हाध्यक्ष श्री.सुरेशराव असलेकर, श्री.बाळासाहेब गलांडे, एसबीसी संघर्ष नेते श्री.बालाजी चिनके,श्री. बाळासाहेब दिवटे,श्रीमती मीरा वीर,मुख्य संयोजक श्री.सतिशराव सपाटे व कार्यक्रमास उपस्थित कोष्टी समाजातील राजकीय,सामजिकआणि विविध क्षेत्रातील लोक कार्यक्रमाला उपस्थित होते.यावेळी सत्काराला उत्तर देताना विद्याताई तारळकर यांनी सांगितले की,आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपण जो नारिशक्ती म्हणून माझा सन्मानचिन्ह,शाल, श्रीफळ देऊन माझा यथोचीत सन्मान केला त्यामुळे आम्हाला सामाजिक,धार्मिक क्षेत्रात काम करण्यास आणखीन बळ व आगळी वेगळी ऊर्जा मिळाली आहे त्या बद्दल मी सर्वांना धन्यवाद देते.समाजाने पाठीशी कौतुकाने थाप दिली त्यामुळे माझी जबाबदारी वाढली आहे असे त्यांनी सांगितले.आभार प्रदर्शना नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## कु. रुची मोहितेने राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला



गुहागर :- महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळच्या वतीने आयोजित ऋतुरंग २०२४ या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत गिमवी विभाग क्र. ३ चे अध्यक्ष राजेश मोहिते व विभागीय महिला हिशोब तपासनीस सौ. शुभांगी राजेश मोहिते या उभयतांची सुकन्या कु. रुची राजेश मोहिते हिने प्रथम क्रमांक पटकावून आपल्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. सेमी इंग्लिश माध्यम, प्राथमिक शाळा मार्गताम्हणे, चिपळूण या शाळेत इयत्ता ४ थी मध्ये शिकणारी कु. रुची राजेश मोहिते ही लहानपणीपासूनच कलासक्त असून अभ्यासू व मेहनती आहे, चित्रकलेत पारंगत रुची अभ्यासासोबतच कलेची आवड जोपासत आपल्या आईवडिलांचे, शाळेचे, गावाचे, विभागाचे, तालुक्याचे नाव उंचावत आहे त्यामुळे बौद्धजन सहकारी संघ, विभाग क्र. ३ च्या वतीने कु. रुची राजेश मोहिते व तिच्या पालकांचे जाहीर अभिनंदन करण्यात आले आहे.

# टाकळी ते नाथ पैठण पायी दिंडीचे शिवणी येथे स्वागत.

केज/प्रतिनिधी ह.भ.प.वै. प्रातःस्मरणीय गोपिचंद बाबा भारती यांनी सुरू केलेल्या केज तालुक्यातील श्री दत्त संस्थान टाकळी ते नाथ पैठण मागील ४६ वर्षांपासून पायी दिंडीचे दत्त संस्थान टाकळी येथुन नाथ पैठण कडे प्रस्थान झाले ह.भ.प.वै. गोपिचंद बाबा भारती यांची मुले विष्णु भाऊ भारती व ह.भ.प.विद्वान अविनाश गोपिचंद बाबा भारती यांनी अखंड हा पायी दिंडी सोहळा



वारकरी, भक्तांच्या सहकार्यांने सुरू ठेवला असुन या दिंडीचे प्रस्थान झाले आहे.या दिंडीचे कुशल व आयोजन अविनाश भारती यांनी उत्कृष्ट केले असुन या दिंडीचे आबासाहेब माधवराव शिंदे, विजय सुपेकर, जालिंदर कोंडिबा शिंदे, श्रीमंत हरिभाऊ शिंदे, विलास शिंदे, बाबुराव घोडके यांनी आनंदोत्सवात स्वागत केले.मौजे शिवणी येथे आबासाहेब माधवराव शिंदे यांनी या पायीं दिंडीतील वारकऱ्यांना व भक्तांना भोजन व्यवस्था करुन भोजन दिले.प्रसाद सेवनानंतर दिंडीचे नाथ (मुंगी) पैठणकडे प्रस्थान झाले.या वेळी ह.भ.प.विद्वान अविनाश गोपिचंद बाबा भारती उत्कृष्ट किर्तनकार महाराज लहानेताई,राजाभाऊ कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी, वारकरी,भक्त गण हे उपस्थित होते.

# राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत स्वयंशासन दिन उत्साहात साजरा

केज/प्रतिनिधी केज शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठानच्या राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत स्वयंशासन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी शाळेचे पूर्णवेळ कामकाज शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थी -विद्यार्थिनींनी पार पाडले. शालेय प्रशासनाचा अनुभव येण्यासाठी तसेच नेतृत्वगुण विकसित होऊन नियोजनाचे धडे मिळावेत यासाठी दरवर्षी स्वयंशासन दिनाचे आयोजन शाळेत करण्यात येते.

सर्वप्रथम क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी. बी. व विद्यार्थिनी मुख्याध्यापिका यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले व शालेय कामकाज सुरु केले.



शाळेतील पहिली ते सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी अध्यापन करण्यात आले व शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. स्वयंशासन दिनाच्या निमित्ताने आपल्याच सहकारी बालमित्रांना शिकवण्याचा अनुभव मिळतो व कायमस्वरूपी एक गोड आठवण राहते.

स्वयंशासन दिनाची विद्यार्थिनी मुख्याध्यापिका म्हणून कु. अनुजा तिडके हिने काम पहिले. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी. बी. व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व कार्यक्रमाचा समारोप केला. या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. राहुल देशमुख, सचिव श्री. गदळे जी. बी. व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. अशोक डांगे यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्वश्री यादव व्ही. बी., देशमुख ए. डी., क्षीरसागर आर. एस.,डिरंगे जी. बी.,मस्के जे. आर.,श्रीमती ध्वजा गायकवाड व श्रीमती अनिता जाधव यांनी परिश्रम घेतले.

# प्रधानसांगवी ते बेंदिगाव जाणारा पांदन रस्ता दोन शेतकऱ्यांनी अडवल्याने शेकडो शेतकऱ्यांचे हाल.

किनवट: शेख शौकत :-प्रधानसांगवीहून बेंदीगावच्या शेती-शिवाराकडे जाणारा परंपरागत वहिवाटीचा रस्ता दोन शेतकर्यांच्या आपसी वादात रोखण्यात आला आहे. प्रधानसांगवी गावापासून पांदणरस्त्याचे काम करण्यात आले परंतू एक फर्लांगचाच रस्ता बंद करुन गावकर्यांसह शेतकर्यांना वेठीस धरल्याचा शेतकर्यांचा आरोप आहे. शिव, पांदण, पुर्वापार वहिवाट रस्त्यांवरील केलेले अतिक्रमण हटवून शेतकर्यांच्या रस्त्याविषयकची कोंडी तात्काळ दूर करण्याचे राज्य सरकारचे महत्वपूर्ण धोरण असले तरीही रस्ता अतिक्रमीत केलेल्या शेतकर्यांवर किनवटच्या तहसिलदारांनी अद्यापही पावबंद करुन रस्ता खुल्ला केलेला नाही. आठवडाभरात रस्ता खुल्ला न केल्यास तहसिल कार्यालयावर गुरां-जनावरांसहीत शेतकर्यांचा लक्षवेधी मोर्चा काढण्यात येणार असून उपोषणाच्या इशार्याचे संबंधित प्रशासनाला निवेदने दिल्याचे प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे. प्रधानसांगवीतील दोन शेतकर्यांच्या आपसी वादामुळे चक्क बेंदी गावच्या शेतीशिवाराकडे जाणार्या पुर्वापार परंपरागतचा वहिवाट रस्त्यावर अतीक्रमन करुन चक्क शेतकर्यांचा रस्ता आडऊन बंद केल्याचा आरोप आहे. प्रधानसांगवी गावापासून अतीक्रमीत रस्त्यापर्यंत पांदणरस्त्याचे काम करण्यात आले आहे. राष्ट्रीय महामार्गालगत केवळ फर्लांगभराचा रस्ता अतीक्रमीत केला आहे. त्यामुळे बेंदी गावच्या शिवारातील शेतात जाण्यासाठी प्रधानसांगवीतील शेतकर्यांना दोन कि.मि.लांब पल्यावरुन दररोज ये-जा करावी लागत असल्यामुळे शेतकरी पुरता हताश झाला आहे. म्हणून तहसिलदारांनी तात्काळ दखल घेऊन रस्ता अतीक्रमण मुक्त करुन शेतकर्यांसाठी रस्ता खुल्ला करावा हाच एकमेव मार्ग असल्याचे वैतागलेल्या माजी उपसरपंच बिभीषण गित्ते,पत्रकार लक्ष्मीकांत मुंडे,मारोती घुगे, चंद्रकांत मुंडे, ज्ञानेश्वर मुंडेंसह शेकडो शेतकर्यांचे म्हणने आहे.

स्थानिकच्या सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली, तहसिलदार डॉ.शारदा चौंडेकर, किनवट पोलीस ठाणे आणि तलाठी व मंडळाधिकार्यांना वैदागलेल्या शेतकर्यांनी उद्देशून इशारा दिला आहे. पाळीव गुरां-जनावरांसह शेतकरी तहसिल कार्यालयासमोर न्याय मागणी घेऊन रस्ता खुल्ला होईपर्यंत उपोषणाला बसणार आहेत. परंपरागतचा वहिवाट रस्ता अतीक्रमण करणार्यांच्या मुसक्या आवळून रस्ता अतीक्रमण मुक्त करुन कायम करुन देण्याची शेतकर्यांची मागणी आहे. १३ मार्च २०२५ रोजी त्यांनी संबंधित प्रशासनाला निवेदने दिलीत. आठ दिवसाचा आवकाश दिला आहे. १७ मार्चपर्यंत कसलीही कारवाई केलेली नाही. २० मार्चनंतर शेतकर्यांच्या गुराढोरांसह शेतकर्यांचा किनवट तहसिल कार्यालयावर उपोषणासाठी मोर्चा धडकल्यास नवल वाटण्याचे एकमेव कारण म्हणजे महसूल विभागाची न्याय मागणी करणार्या शेतकर्यांप्रतीची उदाशीनताच असणार असेही त्यांचे म्हणने आहे.

# लाडक्या बहिणींसाठी पळवला तब्बल ७ हजार कोटी रुपये मागास आणि आदिवासींचा निधी

किनवट: शेख शौकत :-लाडकी बहीण योजनेसाठी सरकारने मागास आणि आदिवासी समाज विकास विभागाचा तब्बल ७ हजार कोटी रुपयांचा निधी इतरत्र वळविला आहे. सरकारची ही कृती घटनाबाह्य व गरीब समाजाच्या तोंडचा घास पळवणारी आहे.सरकारने हा निधी त्या त्या विभागाकडे त्वरीत वर्ग करावा,अशी मागणी सेक्युलर मुव्हमेंट या संघटनेचे जिल्हा संघटक अँड.मिलिंद सर्पे यांनी एका निवेदनाद्वारे सर्व संबंधितांकडे नुकतीच केली आहे. लाडकी बहिण या खर्चिक योजनेसाठी अन्य कोणत्याही विभागाचा निधी आम्ही घेणार नाही, असे सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी सांगितले होते. मात्र सरकार ते विसरले आहे. या विभागातील तब्बल ७हजार कोटी रुपयांचा निधी त्यांनी या योजनेकडे वळवला आणि गरीब मागास समाजाच्या तोंडाला पाने पुसली. त्यांचे हक्काचे पैसे वळवले व त्यांना याची साधी माहितीही या सरकारने दिली नाही, उलट दडवून ठेवण्याचा प्रयत्न केला.सरकारने निवडणूक जिंकली व लाडकी बहीण योजनेसाठी आलेल्या अर्जाची छाननी केली. निवडणुकीपूर्वी सरसकट प्रत्येक अर्ज मंजूर करणाऱ्या सरकारने निवडणूक जिंकल्यानंतर सत्ताप्राप्ती होताच तब्बल ५ लाखांपेक्षा जास्त बहिणींना या योजनेतून वगळले. सरकारची कृती घटनाबाह्य

उर्वरित बहिणींना दरमहा पैसे देणे भाग असल्याने मागास समाजासाठीचा ३ हजार कोटी आणि आदिवासी समाजाचा ४ हजार कोटी असा तब्बल ७ हजार कोटी रुपयांचा निधी या योजनेकडे वळवला. मागासवर्गीय आणि आदिवासी विद्यार्थ्यांना सरकारकडून मिळत असलेल्या मदतीवर याचा परिणाम होणार आहे.सरकारने हा निधी त्वरित त्या त्या विभागाकडे वर्ग करावा. राज्यातील मागास व आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक योजना निधी नसल्याने रखडल्या आहेत.शिष्यवृत्तीसारख्या योजनांचे पैसे न मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे सरकारने याची दखल घ्यावी, अन्यथा यासंदर्भात सेक्युलर मुव्हमेंट या संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ही निवेदनात देण्यात आला आहे.निवेदनावर सेक्युलर मुव्हमेंट चे जिल्हा संघटक अँड.मिलिंद सर्पे यांची स्वाक्षरी आहे.

# अंधश्रद्धा हि सर्व थोतांड आहे.आपण डोळसपणे पाहण्याची गरज आहे. ना. बाबासाहेब पाटील...

अहमदपूर :- येथील अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने गेली सोहळा वर्षा पासून न अवडनार विषय चालू ठेवला आहे. समाज प्रबोधिनी गुणगौरव सोहळ्यात समाजामध्ये काहीतरी विशेष उल्लेखनीय कार्य केले तर त्यांचा सन्मान होतो आणि सन्मान झाल्यावर त्यांच्या जबाबदाऱ्या वाढतात असे मत सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'समाज प्रबोधिनी' गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले, या वेळेस ते अध्यक्ष पदावरून बोलत होते.

माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव यांची विशेष उपस्थिती होती. डॉ.अंजली उगिले, संगीता खंडागळे, अनुराधा नळेगावकर, ब्रह्मकुमारी छाया दीदी, डॉ.पल्लवी कराड,सिमा जाबवेकार, श्रीकांत बनसोडे, आनंद श्रीमगले, वर्षा माळी , अनिता कसबे, ड.नाथराव देमगुंडे, भालचंद्र आलापुरे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

पुढे बोलताना नामदार पाटील म्हणाले डॉ नरेंद्र दाभोळकर यांनी समाजाला शाहणे करण्याचे काम स्वतःचा बळी देऊन केले. माणसांमध्ये श्रद्धा असावी पण अंधश्रद्धा नसावी. जगामध्ये करणी, भानामती, जादूटोणा अशा प्रकारच्या कोणत्याही बाबी नसतात. या सर्व थोतांड आहेत. अशा गोष्टींच्या महिलांनी बळी पडू नये असे आवाहनही यावेळी नामदार पाटील यांनी केले. महिला आज सर्व क्षेत्रांमध्ये आघाडीवर आहेत.




यावेळी मंगल सचिन कानगुले अहमदपूर , प्रा.इशरत शादुल पठाण, डॉ. सोनल दिलगीर रामटेक भोपळा, प्रा.वैशाली अनिल जाधव नादेड, ललिता राजकुमार जाधव नांदेड, वैष्णवी रामकिशन सोळंके जालणा, विजया नागनाथ श्रीमंगले शिरुर ता, सावित्री हनुमंत अडकुते देगलूर, सुरेखा वसंत आचार्य बिदर, गंगासागर पांडुरंग गायकवाड अहमदपूर,शहिर अपेक्षा शेषकुमार डाके लातूर, प्रा.उषा मनोहर काटे पालम या महिलांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी डॉ.वृषाली किन्हाळकर यांनी 'स्त्री काल, आज व उद्या' या विषयावर व्याख्यान देताना सांगितले कालच्या व आजच्या स्त्रीमध्ये फार बदल झाला असून मागील काळात मुलगी झाली तर नातेवाईक नाराज होत होते परंतु सध्याच्या काळात ते चित्र फारसे दिसत नाही.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष उद्धव इप्पर, उपाध्यक्ष डॉ.अतुल खडके, प्रधान सचिव प्रा.रत्नाकर नळेगावकर, कार्याध्यक्ष मेघराज गायकवाड, शिला घाटोळ, रोहिणी केंद्रे,डा पुनम केंद्रे, आशा रोडगे, सुरेश डबीर, भालेराव चंद्रशेखर, अजहर बागवान, सुरेखा उपरवाड, अंजली वाघंम्बर, वैशाली कदम, पूजा गायकवाड, सुप्रिया पाढरे,ड पल्लवी गायकवाड. गोपाल पटेल दयानंद जाधव.ई यांची उपस्थिती होती.या। कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वर्षा माळी, प्रा मारोती पाटील यानी केले पुरस्कार व व्याख्यानास मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते....

## वाढत्या तापमानावर सीड बॉलचा उपाय; सौ . विजयमाला कदम कन्या प्रशालेचा उपक्रम.




पुणे / प्रतिनिधी : - भारती विद्यापीठाची सौ विजयमाला कदम कन्या प्रशालेत पर्यावरण रक्षण जागरूकता देशी बीजेचे संवर्धन व जागतिक तापमान वाढी वरील उपाय म्हणून ३०००सीड बॉल तयार करणे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते माती राख शेण व इतर सेंद्रिय खतापासून तयार केलेल्या ओल्या मातीच्या बॉलमध्ये देशी बीज टाकून हे सिडबॉल तयार करण्यात आले पावसाळ्यात शालेय परिसरात तसेच छोट्या टेकडीवरती नैसर्गिक पाण्याच्या उपलब्ध स्तोत्रामध्ये हे बॉल टाकून हरित आवरण वाढवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत या उपक्रमासाठी प्रशालेच्या मुख्याध्यापिकासौ वंदना देशमुख यांनी मार्गदर्शन केले त्याचबरोबर सौ शितल विश्वासराव यांनी प्रकल्पाच्या कारवाईसाठी उत्तम असे नियोजन केले इयत्ता सहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी यात उत्साहाने सहभाग घेतला होता सुमारे ३००० च्या वर सिडबॉल तयार करण्यात आले प्रशाली सर्व शिक्षक यावेळी उपस्थित होते सर्व यावेळी पर्यावरण रक्षक वृक्षारोपण संवर्धनासाठी शपथ घेण्यात आली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE